जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 0 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सोबत डॉ. प्रल्हाद माने, ब्रतीन सेनगुप्ता, ए. बी. आचार्य, डॉ. वैशाली पवार, डॉ. तानाजी चौगुले.

# विद्यार्थ्यांसाठी युवा संसद महत्वाचा उपक्रम

## कुलसचिव डॉ. शिंदे : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणाली अवगत होण्याच्यादृष्टीने युवा संसद हा उपक्रम अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा संपन्न झाली. याच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

कुलसचिव शिंदे म्हणाले, पूर्वी आंदोलने हा संसदीय राजकारणात प्रवेश करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग होता. अलिकडे मात्र हा मार्ग आक्रसत चाललेला आहे. संसदीय कार्यप्रणालीचे यथायोग्य आकलन असणाऱ्यांसाठी येथे मोठी संधी उपलब्ध आहे. त्या दृष्टीने युवा संसद हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे.

परीक्षक म्हणून कोलकता येथील माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या युवा संसद उपक्रमाचे संचालक ए. बी. आचार्य आणि पुणे येथील श्री शाहू मंदिर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वैशाली पवार हे उपस्थित होते.

विद्यापीठाच्या युवा संसद स्पर्धा उपक्रमाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, डॉ. सुखदेव उंदरे आणि आकाश ब्राह्मणे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2025
पुढारी

# संसदीय कार्यप्रणाली अवगत होण्याच्या दृष्टीने युवा संसदेची महत्त्वाची भूमिका

## डॉ. व्ही. एन. शिंदे; विद्यापीठात १७ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणाली अवगत होण्याच्या दृष्टीने युवा संसद हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

विद्यापीठात केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा (२०२४-२५) उत्साहात झाली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात अध्यक्षस्थानावरून डॉ. शिंदे बोलत होते. ते म्हणाले, पूर्वी आंदोलने हा संसदीय राजकारणात प्रवेश करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग होता. अलीकडे मात्र हा मार्ग आक्रसत चाललेला आहे. शिवाजी विद्यापीठाची या स्पर्धेतील कामगिरी वर्षागणिक उंचावत चालली आहे. यंदाही या संघाकडून अधिक चांगली कामगिरी उंचावेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. समवेत डॉ. प्रल्हाद माने, माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, संचालक ए. बी. आचार्य, डॉ. वैशाली पवार, डॉ. तानाजी चौगुले आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून कोलकाता (पश्चिम बंगाल) येथील राज्यसभेचे माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या युवा संसद उपक्रमाचे संचालक ए. बी. आचार्य व पुणे येथील श्री शाहू मंदिर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. वैशाली पवार उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाच्या युवा संसद स्पर्धा उपक्रमाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, डॉ. सुखदेव उंदरे व आकाश ब्राह्मणे यांनी परिश्रम घेतले.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# पर्यावरण संतुलनासाठी उपभोग कमी करावा

## अनुप जयपूरकर : विद्यापीठात पर्यावरणभान व पत्रकारिता विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज):**

पर्यावरणाचे प्रश्न गंभीर होण्यास मानवाच्या उपभोगाच्या सवयी कारणीभूत ठरत असून मानवाने उपभोगाचे प्रमाण कमी केल्यास पर्यावरणाचे संतुलन होण्यास मदत होईल, असे मत पुणे येथील पर्यावरण प्रश्नांचे अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार अनुप जयपूरकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स आणि लक्ष्मी मल्टिपर्पज फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणभान आणि पत्रकारिता या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर किर्लो स्कर ऑईल इंजिन्सचे जनरल मॅनेजर हरिष सायवे, लक्ष्मी मल्टिपर्पज फौंडेशनचे विनायक देसाई, पर्यावरण अभ्यासक संदीप चोडणकर आणि अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

जयपूरकर म्हणाले, विकास आणि प्रगतीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरु आहे. जंगलतोड, शहरीकरण आदींमुळे वातावरणातील बदलासारख्या आ– पत्तींना तोंड द्यावे लागत आहे. अलिकडेच मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीने शेतीयोग्य माती वाहून गेली. या



परिसरात नजीकच्या काळात पुरेशी शेती पिकू शकणार नाही, हा अत्यंत गंभीर धोका आहे. माणूस उपभोगजन्य बनत असून दिवसेंदिवस तो अघोरी पद्धतीने निसर्गाचा उपभोग होत आहे. यातून पर्यावरणाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नांची तीव्रता कमी करायची असेल तर माणसांनी सवयी बदलून निसर्गपूरक सवयींचा अंगिकार केला पाहिजे.

दुसर्या सत्रात पाणी प्रश्नाचे अभ्यासक संदीप चोडणकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. नदी स्वच्छ राखली तर नदीच्या परिसरातील जीवसृष्टी आणि जैवविविधता समृद्ध राहील. मानवाच्या अस्तित्त्वासाठी नदी आणि पाण्याची शुद्धता आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी साक्षरता राबवली पाहिजे.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पर्यावरणीय प्रश्नांवर भाष्य केले. ते म्हणाले, पाणी, हवा, ध्वनी आदींच्या प्रदूषणाची चर्चा होते. परंतु जंगलातील प्रदूषणाची तितकीशी चर्चा होत नाही. देशातील जंगलेच प्रदूषणामुळे धोक्यात असून त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सानिका पाटील हिने केला. सूत्रसंचालन समृद्धी मोदक हिने तर आभार जिजा जाधव हिने मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2025
पुण्यनगरी

# पर्यावरण संतुलनासाठी सवयी बदला : जयपूरकर

## विद्यापीठात 'पर्यावरणभान व पत्रकारिता' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणाचे प्रश्न गंभीर होण्यास मानवाच्या उपभोगाच्या सवयी कारणीभूत ठरत आहेत. या प्रश्नांची तीव्रता कमी करायची असेल, तर माणसांनी सवयी बदलून निसर्गपूरक सवयींचा अंगिकार केला पाहिजे, असे मत पुणे येथील पर्यावरण प्रश्नांचे अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार अनुप जयपूरकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स आणि लक्ष्मी मल्टिपर्पज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरणभान आणि पत्रकारिता' या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. ते म्हणाले, विकास आणि प्रगतीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू आहे. जंगलतोड, शहरीकरण आदीमुळे वातावरणातील बदलासारख्या आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. माणूस उपभोगजन्य बनत असून, दिवसेंदिवस तो अघोरी पद्धतीने निसर्गाचा उपभोग घेत आहे. यातून पर्यावरणाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यासाठी सवयी बदलल्या पाहिजेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचे उद्घाटन करताना मान्यवर.

दुसऱ्या सत्रात पाणी प्रश्नाचे अभ्यासक संदीप चोडणकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. नदी स्वच्छ राखली, तर नदीच्या परिसरातील जीवसृष्टी आणि जैवविविधता समृद्ध राहील. मानवाच्या अस्तित्वासाठी नदी आणि पाण्याची शुद्धता आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी साक्षरता राबवली पाहिजे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले पाणी, हवा, ध्वनी आदींच्या प्रदूषणाची चर्चा होते; परंतु जंगलातील प्रदूषणाची तितकीशी चर्चा होत नाही. देशातील जंगलेच प्रदूषणामुळे धोक्यात असून, त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

यावेळी किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे जनरल मॅनेजर हरिश सायवे, लक्ष्मी मल्टिपर्पज फाऊंडेशनचे विनायक देसाई, पर्यावरण अभ्यासक संदीप चोडणकर आणि अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सानिका पाटील हिने करून दिला. सूत्रसंचालन समृद्धी मोदक हिने केले. आभार जिजा जाधव हिने मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 0 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अनुप जयपूरकर, शरद आजगेकर, हरीष सायवे, विनायक देसाई, डॉ. शिवाजी जाधव आदी.

# शिवाजी विद्यापीठात पर्यावरणभान, पत्रकारितेवर कार्यशाळा

कोल्हापूर : पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी अघोरी पद्धतीने होणारा निसर्गाचा उपभोग थांबवावा, असे प्रतिपादन पुणे येथील पर्यावरण प्रश्नांचे अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार अनुप जयपूरकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स आणि लक्ष्मी मल्टिपर्पज फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पर्यावरणभान आणि पत्रकारिता" या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे जनरल मॅनेजर हरिष सायवे, लक्ष्मी मल्टिपर्पज फौंडेशनचे विनायक देसाई, पर्यावरण अभ्यासक संदीप चोडणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, देशाच्या जंगलातील प्रदूषणामध्येही प्रचंड वाढ होत आहे.याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहीजे. चोडणकर म्हणाले, जीवसृष्टी व जैवविविधता समृद्धीसाठी नदीचे प्रदुषण रोखणे गरजेचे आहे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सानिका पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय केला. समृद्धी मोदक यांनी सूत्रसंचालन केले. जिजा जाधव यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# महात्मा गांधी यांचा अहिंसाधर्म सर्वश्रेष्ठ: डॉ.अशोक चौसाळकर

**कोल्हापूर, (महा न्यूज अ‍ॅण्ड व्हूज):**

महात्मा गांधी यांचा अहिंसा हा मानवजातीच्या दृष्टीने सर्वात मोठा धर्म असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि गांधी अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांची जयंती व विश्व अहिंसा दिनानिमित्त 'लोकशाही आणि अहिंसा' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे अध्यक्षस्थानी होते. यावेळी सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, समन्वयक डॉ.चांगदेव बंडगर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. मानवजातीने त्याचा




स्वीकार केला पाहिजे. अहिंसेची परंपरा महात्मा गांधी यांनी पुढे नेलेली आहे. हिंसा हा मानवजातीच्या विकासातील अडथळा तर क्षमा हा श्रेष्ठतम गुण आहे. गांधी लोकशाहीचे मोठे पुरस्कर्ते होते. सत्ताबदल अहिंसेच्या मार्गाने होऊ शकतो. महात्मा गांधी यांना विकेंद्रित लोकशाही अभिप्रेत होती. त्यांच्या मते भारत गणराज्य असल्याने त्यात अधिकाराची उतरंड नसावी. सर्व निर्णय एकमताने घेतले पाहिजेत. ग्रामपंचायतीपेक्षा ग्रामसभेला गांधी महत्त्व देतात. त्यांना अपेक्षित लोकशाहीच्या दिशेने आपण वाटचाल केली पाहिजे.

यावेळी डॉ.सचिन भोसले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुशांत माने यांनी परिचय करून दिला. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : डॉ. अशोक चौसाळकर यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना व्ही. बी. शिंदे. सोबत डॉ. सूर्यकांत बंडगर, डॉ. सचिन भोसले.

# 'महात्मा गांधी यांचा अहिंसाधर्म मानवजातीसाठी सर्वश्रेष्ठ'

कोल्हापूर : महात्मा गांधी यांचा अहिंसा हा मानवजातीच्या दृष्टीने सर्वात मोठा धर्म आहे. "मानवजातीने त्याचा स्वीकार केला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि गांधी अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व अहिंसा दिनानिमित्त आयोजित 'लोकशाही आणि अहिंसा" विषयावर ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते.डॉ. सचिन भोसले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुशांत माने यांनी परिचय करून दिला. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात हिंदी पखवाडाचा समारोप

कोल्हापूर : हिंदी भाषा जगामध्ये बोलली जाणारी दुसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. या भाषेच्या माध्यमातून अनुवाद, राजभाषा अधिकारी यांसह विविध क्षेत्रांमध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन यूको बँकेचे पुणे येथील राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये 'हिंदी पखवाडा'' समापन समारोह व विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी आजरा महाविद्यालयाचे डॉ. अशोक बाचूळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.यावेळी पोस्टर प्रेझेंटेशन, काव्य वाचन, शॉर्ट फिल्म मेकिंग, वाद-विवाद, निबंध लेखन व अनुवाद स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. जयसिंग कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गीता दोडमणी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आराधना कदम व गुलामगौस तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले. यावेळी यूको बँकेचे व्यवस्थापक क्रांतिकुमार देवरे, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. कोळेकर, डॉ. चौगले, प्रतीक्षा ठुंबरे, डॉ. मकर, डॉ. भोसले, डॉ. मुंज आदी उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज




# महाराष्ट्री अपभ्रंशातून मराठीचा पूर्वइतिहास सापडतो : डॉ. गोमटेश्वर पाटील

**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज):**

पर्यावरणाचे प्रश्न गंभीर होण्यास मानवाच्या उपमहाराष्ट्री अपभ्रंशातून मराठीचा पूर्वइतिहास सापडतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी केले. ते 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्ताने 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ येथे बोलत होते. पाटील पुढे म्हणाले की, महाराष्ट्री अपभ्रंश भाषेतून अभिजात मराठी भाषेचा मागोवा घेता येतो. तसेच मराठीच्या पूर्वपरंपराही शोधता येतात. दुसऱ्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत महाराष्ट्री अपभ्रंश, प्राकृत मराठी कशी विकसित गेली आणि त्या काळात भाषेचे स्वरूप कसे होते याचे विवेचन अनेक दाखले देऊन पाटील यांनी केले. यासाठी महाराष्ट्री अपभ्रंश आणि प्राकृत मराठीचा इतिहास नव्यान लिहणं गरजेचं आहे. आणि काम संशोधक विद्यार्थ्यांनी करावं असे मत पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून मांडे

याच कार्यक्रमात दुसरे वक्ते डॉ. अनिल गवळी यांनीही अभिजात मराठी भाषा या विषयावर मांडणी केली. ते बोलताना म्हणाले की, मराठी ही काळाच्या कसोटीवर टिकणारी भाषा असल्याने मराठीला अभिजात दर्जा मिळाला. ते पुढे म्हणाले की, बहुभाषिक देशात भाषांना अनन्यसाधारण महत्त्व असतं. भाषा ह्या सामाजाचं सांस्कृतिक संचित असतात. त्यामुळे आज भाषा टिकवणं हे खूप मोठे आव्हान असल्याचेही त्यांनी सांगितलं.

कार्यक्रमाचं प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय प्रा. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे होते. ते म्हणाले की, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणं ही मराठी भाषेच्या दृष्टीने खूप महत्त्वाची बाब आहे. मराठीला मोठा इतिहास आणि समृद्ध परंपरा असल्याचेही त्यांनी नमुद केले. सूत्रसंचालन स्मिता राजमाने यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी संशोधक विद्यार्थी, एम.ए.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2025
पुढारी

# परिवर्तन घडविणारे संशोधन करा

## किरण कुलकर्णी : संशोधक विद्यार्थ्यांची कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संशोधन केवळ विशिष्ट समूहापुरते मर्यादित नसावे. हे संशोधन समाज जीवनमानात परिवर्तन घडवणारे करा, अशी अपेक्षा 'सारथी'च्या सह व्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांची सर्वाधिक संख्या ही 'सारथी'च्या अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कोल्हापूर उपकेंद्राच्या वतीने मराठा, कुणबी समाजांतील संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. शिवाजी विद्यापीठातील शाहू सभागृहात झालेल्या या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### ४३६ विद्यार्थ्यांनी घेतला अधिछात्रवृत्तीचा लाभ

सारथीच्या माध्यमातून सन २०१९ पासून राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेतून आतापर्यंत पाच विद्यापीठांतील तब्बल ४३६ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचा लाभ झाला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

संशोधनाचा उपयोग ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, शेतकरी गट व सामाजिक संस्थांशी संवाद साधत समाजकार्यासाठी व्हावा, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. आशिष भुवड, दिग्विजय पाटील, अपूर्वा पाटील, मयुरेश पाटील आणि संदीप माने या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी त्यांच्या संशोधनावर आधारित सादरीकरण केले. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी 'संशोधनाची उपयुक्तता व स्टार्टअप' या विषयावर मार्गदर्शन केले.

सारथीचे कार्यकारी अधिकारी डॉ. विलास पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी सहा. लेखाधिकारी अनिस पटेल, प्राध्यापक तसेच सारथीचे पीएच.डी. संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संशोधन अधिकारी नयन गुरव यांनी आभार मानले.